# सातारा जिल्हा पोलीस भरती सन २०१८

## बॅन्डस्मन उमेदवारांकरीता सुचना

१) बॅन्डस्मन पदाच्या प्रात्यक्षिक चाचणीसाठी पात्र उमेदवारांची यादी या सोबत प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर यादीतील बॅन्डस्मन उमेदवारांची ३० गुणांची वाद्य वाजविण्याच्या प्रत्यक्षिक चाचणीची परिक्षा **पोलीस परेड ग्राउंड, हजेरी माळ एस.टी.स्टॅन्ड शेजारी, सातारा** येथे **दि.०३/०४/२०१८ रोजी सकाळी ०७.०० वा. ते सायंकाळी ०६.०० (१८.००) वा. व दि.०४/०४/२०१८ रोजी सकाळी ०७.०० वा. ते १२.०० वा पर्यंत** घेण्यात येणार असून यादीतील पात्र उमेदवारांनी सदर परिक्षेस दिलेल्या दिनांकास वेळेत उपस्थित राहावे. **नमुद दिनांक व वेळेनंतर येणाऱ्या उमेदवारांस प्रात्यक्षिक परिक्षेस कोणत्याही सबबीवर प्रवेश दिला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**

२) सदर उमेदवारांनी प्रात्यक्षिक परिक्षेस येताना मैदानी चाचणीवेळी दिलेले **ओळखपत्र व अन्य ओळखपत्र (आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, वाहन चालविण्याचा परवाना, पॅन कार्ड यापैकी कोणतेही एक) सोबत घेवून येणे बंधनकारक आहे.** अन्यथा परिक्षेस बसण्यास परवानगी देण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.